भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०३/२०१७

**१) जीप गाडी चालकाच्या निष्काळजीपणामुळे म्हैसला धडक मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०८/०३/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपले म्हैसे हेल्याकडे नेली होती व ईटगांव येथुन आपली म्हैस डांबरी रोडने आपले गावाकडे घेवुन जात असतांना पागोरा गावाजवळ भंडारा कडुन अडयाळ कडे डांबरी रोडने जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील जीपगाडी क्र. एमएच. ३६ २०४९ हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन म्हैसीला धडक मारून जखमी केल्याने फिर्यादी सुरेश पांडुरंग बारसकर वय ४५वर्ष रा. पहेला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,४२९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

**२) ट्रक चालकाने हल्ले,म्हैस कोंबुन,डांबुन निर्दयतेची वागणुक देवुन कत्तली करिता वाहतुक व कोणतेही पशुवैधकीय प्रमान पत्र जवळ न बाळगता मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ८/०३/२०१७ रोजी ०२.०० वा. दर. यातील आरोपी क्र.१ चालकाने आरोपी क्र. २ चे ताब्यातील ट्रकमध्ये १७ हल्ले व १ म्हैस कोंबुन डांबुन निर्दयतेची वागणुक देवुन कत्तली करिता वाहतुक करतांनी व १आरोपी क्र. १ने गोवंश जनावरे वाहतुकी संबधी कोणतीही वैध प्रमानपत्र, पशुवैधकीय अधिकाऱ्यांचे प्रमान पत्र जवळ न बाळगता ट्रक क्र. एमएच.३५ के २६१४ व जनावरे एकुन किंमती ६,८०,०००/—रू. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मेश्राम यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१) (ड) (ई), प्राणी निर्दयतेने वागविण्याचा कायदा सहकलम ५(अ) (१)प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ६६/१९२ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्यापिट केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ६/०३/२०१७ रोजी ०९.३० वा. दर. यातील आरोपी व त्याचे नातेवाईकामध्ये भांडने सुरू होते त्यावेळी फिर्यादी हे भांडन सोडविण्याकरिता गेले असता यातील आरोपी याने फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारपीट व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३२३,५०४५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अनाधिकृतपणे घरात प्रवेश करून विचारपुस केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०८/०३/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे राहते घरात आरोपीने घरातील लोकांची कोणतीही परवानगी न घेता घरात आत येवुन ओळख नसतांना सुध्दा विचारपुस न केल्याने फिर्यादी फारूख कादर अकबानी वय ४२ वर्ष रा. बुरडे मोहल्ला लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे

५) पाळीव कुत्र्याने चावा घेवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०८/०३/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील आरोपीचा पाळीव कुत्रा हा फिर्यादीचे अंगावर धाऊन फिर्यादीचे डावे पायाचे घुटण्याजवळ तीन ठिकाणी चावा घेवुन जखमी केल्याने आरोपीचे घरचे व्यक्ती हजर असतांनी त्यांनी कुत्र्यास आवरण्यास हयगयी केल्याने फिर्यादी मारकंड सांवजी शिवनकर वय ७४ वर्ष रा. बेलाटी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०८/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १७६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.